ePaper

पाकिस्तानातील हिंदूंची लोकसंख्या 14.6 टक्क्यांवरून 1.61 टक्क्यांवर

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

पान 3 वरुन...

पार्किंगमधील आगीने उडवली झोप; २१ वाहने भस्मसात!

WWW.MAHAENEWS.COM | शुक्रवार, दि. 30 ऑक्टोबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

देशभरात पिछेहाट; चार राज्यांतील निवडणुकांत काँग्रेसला केवळ एका जागेवर यश

नागपूरने राखली काँग्रेसची लाज!

महाईन्यूज । नवी दिल्ली

देशभरातील चार राज्यांमध्ये झालेल्या विधान परिषद निवडणुकांच्या निकालांनी काँग्रेससमोर संघटनात्मक आणि राजकीय आव्हान उभे केले आहे. उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, बिहार आणि कर्नाटक या चार राज्यांतील २८ जागांच्या निवडणूक फेरीत भाजपने १३ जागा जिंकल्या, तर भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीने (एनडीए) एकूण १६ जागांवर विजय मिळवला. समाजवादी पक्षाने पाच जागा जिंकल्या. दुसरीकडे, काँग्रेसला केवळ एका जागेवर विजय मिळवता आला. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील नागपूर पदवीधर मतदारसंघातून अभिजित वंजारी यांनी मिळवलेला विजय काँग्रेससाठी महत्त्वाचा दिलासा ठरला आहे.

देशातील या निवडणूक फेरीत काँग्रेसची कामगिरी मर्यादित राहिल्याने नागपूरमधील विजयाचे राजकीय महत्त्व वाढले आहे. 'देशभरात पिछेहाट, नागपूरमध्ये विजयाने काँग्रेसची लाज राखली' अशी या निकालाची राजकीय मांडणी केली जात आहे.

महाराष्ट्रात महाविकास आघाडीला तीन, महायुतीला दोन जागा

देशातील एकूण चित्र काँग्रेससाठी निराशाजनक असले, तरी महाराष्ट्रातील पाच जागांच्या निवडणुकीत महाविकास आघाडीने तीन जागा जिंकल्या, तर महायुतीला दोन जागा मिळाल्या. पुणे शिक्षक मतदारसंघात भाजपचे कौस्तुभ गावडे विजयी झाले, तर अमरावती शिक्षक मतदारसंघात शिवसेनेचे किरण सरनाईक यांनी विजय मिळवला. पुणे पदवीधर मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या हर्षदा देशमुख-जाधव यांनी भाजपच्या डॉ. स्मिता जाधव यांचा पराभव केला. छत्रपती संभाजीनगर पदवीधर मतदारसंघातही शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे डॉ. प्रतापसिंह पाटील विजयी झाले. नागपूर पदवीधर मतदारसंघातील काँग्रेसचा विजय या निकालाला विशेष महत्त्व देणारा ठरला. मात्र, महाराष्ट्रातील महाविकास आघाडीच्या तीन जागा आणि काँग्रेसच्या देशपातळीवरील एका जागेची तुलना करताना दोन्ही आकडे वेगवेगळ्या राजकीय आघाड्या आणि भौगोलिक व्याप्ती दर्शवतात, हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

देशात भाजपा आघाडीवर, काँग्रेसला मर्यादित यश

या निवडणूक फेरीत उत्तर प्रदेशातील ११, बिहारमधील आठ, महाराष्ट्रातील पाच आणि कर्नाटकातील चार अशा एकूण २८ विधान परिषद जागांचा समावेश होता. भाजपने १३ जागा जिंकल्या, तर भाजप आणि त्याच्या मित्रपक्षांनी मिळून १६ जागांवर विजय मिळवला. समाजवादी पक्षाने पाच जागा मिळवत उत्तर प्रदेशात आपली उपस्थिती दाखवली. काँग्रेसला केवळ एक जागा मिळाली. विशेष म्हणजे, कर्नाटकात सत्तेवर असलेल्या काँग्रेसला या निवडणुकीत एकही जागा जिंकता आली नाही. भाजप-जेडीएस आघाडीने तेथील चारही जागा जिंकल्या. बिहारमध्ये जनसुराज पक्षाने विधान परिषदेत खाते उघडले. दरभंगा शिक्षक मतदारसंघात जनसुराजचे उमेदवार सुरेश प्रसाद राय यांनी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मदन मोहन झा यांचा ३२४ मतांनी पराभव केला. त्यामुळे बिहारमधील या निकालानेही काँग्रेससमोरील आव्हाने अधोरेखित केली.

नागपूरमध्ये भाजपला धक्का; काँग्रेसचा सलग दुसरा विजय

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे गृहक्षेत्र असलेल्या नागपूरमध्ये भाजपचे उमेदवार सुधाकर कोहळे यांचा पराभव होणे हा या निवडणुकीतील सर्वाधिक चर्चेचा निकाल ठरला. काँग्रेसचे विद्यमान विधान परिषद सदस्य अभिजित वंजारी यांनी ६७,२३१ मते मिळवत भाजपच्या कोहळे यांचा पराभव केला. कोहळे यांना ६३,९६० मते मिळाली. वंजारी यांनी ३,२७१ मतांनी विजय मिळवत नागपूर पदवीधर मतदारसंघ कायम राखला. या मतदारसंघाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी १९९० ते २०१४ या कालावधीत नागपूर पदवीधर मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले होते. त्यामुळे या मतदारसंघातील भाजपचा पराभव राजकीयदृष्ट्या विशेष लक्षवेधी ठरला आहे. मतमोजणीच्या सुरुवातीच्या टप्प्यांत सुधाकर कोहळे आघाडीवर होते. दुसऱ्या फेरीनंतर त्यांची आघाडी ४,२९४ मतांची होती. मात्र, आवश्यक मतांचा कोटा कोणत्याही उमेदवाराला पहिल्या पसंतीच्या मतांतून गाठता न आल्याने दुसऱ्या पसंतीच्या मतांची मोजणी करण्यात आली. त्यानंतर वंजारी यांनी आघाडी घेत विजय मिळवला. या मतदारसंघातील मतमोजणी ४० तासांहून अधिक काळ चालली.

पुण्यातील पाणीटंचाईवर महापौरांचा 'ॲक्शन प्लॅन'!

गाड्या धुणे, बांधकामे आणि जलतरण तलावांसाठी पिण्याचे पाणी वापरल्यास दंड

महाईन्यूज । पुणे

राज्यात निर्माण झालेली गंभीर दुष्काळाची स्थिती आणि धरणातील उपलब्ध पाणीसाठ्याच्या पार्श्वभूमीवर पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी महापौर मंजुषा नागपुरे यांनी प्रशासनाला कडक निर्देश दिले आहेत. महापालिकेच्या सर्व १५ क्षेत्रीय कार्यालयांमध्ये २४ तास कार्यरत असलेले 'पाणीटंचाई व आपत्ती नियंत्रण कक्ष' स्थापन करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच शहरातील पाणीगळती, अनधिकृत नळजोडण्या, पाणीचोरी आणि टँकरच्या काळाबाजाराला आळा घालण्याबरोबरच पिण्याच्या पाण्याचा इतर कामांसाठी होणारा वापर रोखण्याचे निर्देश देखील महापौरांनी दिले आहेत.

टँकरच्या दरांवर नियंत्रण

पाणीटंचाईच्या काळात खासगी टँकरचालकांकडून नागरिकांची आर्थिक लूट होऊ नये, यासाठी टँकरद्वारे होणाऱ्या पाणीपुरवठ्यावर क्षेत्रीय कार्यालयांच्या नियंत्रण कक्षाचे नियंत्रण राहणार आहे. टंचाईग्रस्त भागांत महापालिकेतर्फे मोफत टँकर उपलब्ध करून देणे आणि खासगी टँकरच्या दरांवर कडक मर्यादा लागू करून काळाबाजार रोखण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

राज्यातील विविध भागात दुष्काळाची स्थिती निर्माण झाली आहे. पुढील वर्षी पाऊस उशीरा येणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे. त्यामुळे उपलब्ध पाण्याचे नियोजन करण्यासाठी दोन आठवड्यापूर्वी राज्य सरकारने सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना दहा टक्के पाणी कपात करण्याचे आदेश दिले आहेत.राज्यात दुष्काळी परिस्थिती असताना उपलब्ध पाण्याचा प्रत्येक थेंब जपणे आवश्यक असून, नागरिकांना पुरेसे आणि नियमित पाणी उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची प्राथमिकता असली पाहिजे, असे महापौर नागपुरे यांनी स्पष्ट केले आहे.

आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ आणि संबंधित कायदेशीर तरतुदींच्या अनुषंगाने पाणीपुरवठ्याचे सूक्ष्म नियोजन करून तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना त्यांनी महापालिका प्रशासनाला दिल्या आहेत. महापालिकेच्या सर्व १५ क्षेत्रीय कार्यालयांमध्ये स्वतंत्र पाणीटंचाई व आपत्ती नियंत्रण कक्ष सुरू करण्यात येणार आहेत. या कक्षांमध्ये पाणीपुरवठा, आरोग्य आणि आपत्ती व्यवस्थापन विभागांचे अधिकारी व कर्मचारी २४ तास कार्यरत राहतील.

गाड्या धुणे, बांधकामांसाठी पाणी वापरल्यास कारवाई

पिण्याच्या पाण्याचा वापर गाड्या धुणे, खासगी बांधकामे, जलतरण तलाव, बागा यासह रस्ते धुणे यांसारख्या बिगर-पिण्याच्या कामांसाठी करण्यास बंदी घालण्याचे आदेश महापौरांनी दिले आहेत. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्याबरोबरच आवश्यकतेनुसार नळजोडणी खंडित करण्याची कारवाई करावी, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

नागरिकांना पाणीगळती, टँकरची मागणी आणि पाणीपुरवठ्याशी संबंधित तक्रारी नोंदविण्यासाठी स्वतंत्र हेल्पलाइन क्रमांक आणि व्हॉट्सॲप सुविधा उपलब्ध करून द्यावेत. या तक्रारींचे २४ तासांच्या आत निवारण करण्याची जबाबदारी प्रशासनावर सोपविण्यात आली आहे. महापालिका प्रशासनाला देण्यात आलेल्या आदेशाची पालन करून आणि सुचविण्यात आलेल्या सर्व उपाययोजनांची तातडीने अंमलबजावणी करून त्याचा सविस्तर अहवाल तीन दिवसांत महापौर कार्यालयाकडे सादर करण्याचे मंजुषा नागपुरे यांनी दिले आहेत.

शहरातील मुख्य जलवाहिन्या, वितरण वाहिन्या आणि पाण्याच्या टाक्यांमधील गळती शोधण्यासाठी विशेष द्रुतगती दुरुस्ती पथके तयार करावीत, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. अनधिकृत नळजोडण्या आणि व्यावसायिक कारणांसाठी होणारी पाणीचोरी शोधून संबंधित जोडण्या खंडित करण्यासह दोषींवर कायदेशीर आणि दंडात्मक कारवाई करावी, असे आदेश देण्यात आले आहेत.

महापौर मंजुषा नागपुरे म्हणाल्या, राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये दुष्काळाची स्थिती गंभीर आहे. पुणे शहराला पाणीपुरवठा करण्यात येणाऱ्या धरणातील पाणीसाठा लक्षात घेऊन त्याचे नियोजन होणे आवश्यक आहे. पाणी गळती पाणी चोरी याबरोबरच पाण्याचा गैरवापर करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचे आदेश आयुक्तांना दिले आहे.

आयुर्वेदिक उपचारकेंद्राच्या नावाखाली देहविक्रय दाम्पत्य अटकेत; चार तरुणी ताब्यात

महाईन्यूज । पुणे

आयुर्वेदिक उपचार केंद्राच्या नावाखाली देहविक्रयाचा प्रकार पोलिसांनी उघडकीस आणला. या प्रकरणी नऱ्हे पोलिसांनी दाम्पत्याला अटक केली. या प्रकरणी चार तरुणींना ताब्यात घेण्यात आले. महादेवी विकास चौगुले (वय ४२), विकास शंकर चौगुले (वय ५०, रा. सिंहगड रस्ता) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. या बाबत पोलीस हवालदार स्वप्नील सूर्यवंशी यांनी नऱ्हे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वडगाव बुद्रुक परिसरातील एका सोसायटीतील सदनिकेत आयुर्वेदिक उपचार केंद्राच्या नावाखाली देहविक्रय सुरू असल्याची माहिती नऱ्हे पोलिसांना मिळाली. त्यानंतर मंगळवारी रात्री साडेआठच्या सुमारास पोलिसांनी सापळा लावला. बनावट ग्राहकाच्या माध्यमातून पोलिसांनी खातरजमा केली. पोलिसांनी सदनिकेत छापा टाकला. या कारवाईत चार तरुणींना ताब्यात घेण्यात आले. तरुणींना देहविक्रयास प्रवृत्त केल्या प्रकरणी चौगुले दाम्पत्याला अटक करण्यात आली.

एका हॉटेलमध्ये सुरू असलेल्या देहविक्रयाचा प्रकार गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने (एएचटीयू) उघडकीस आणला. या प्रकरणी परराज्यातील दोन तरुणींना ताब्यात घेण्यात आले. तरुणींना देहविक्रयास प्रवृत्त केल्याप्रकरणी आसाममधील तीन दलालांसह चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बंडगार्डन रस्ता परिसरातील एका हॉटेलमध्ये तरुणींना पैशांचे आमिष दाखवून आणले असून, त्यांना देहविक्रयास प्रवृत्त केले जात असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली.

त्यानंतर पोलिसांच्या पथकाने बनावट ग्राहकाच्या माध्यमातून खातरजमा केली. पोलिसांच्या पथकाने तेथे छापा टाकला. या कारवाईत पोलिसांनी दोन परप्रांतीय तरुणींना ताब्यात घेतले. अतिरिक्त पोलीस आयुक्त तेजस्वी सातपुते, उपायुक्त गौहर हसन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक आशालता खापरे, सहायक निरीक्षक सोनाली जगदाळे-साठे, पोलीस कर्मचारी ईश्वर आंधळे, बबनराव केदार, अमेय रसाळ, अविनाश कोंडे, किशोर भुजबळ, सुरेखा आंधळे, मनीषा वायसे, फराह पठाण, वैशाली खेडेकर, वैशाली इंगळे यांनी ही कारवाई केली.

पार्किंगमधील आगीने उडवली झोप; २१ वाहने भस्मसात!

कुणाल मार्केटमध्ये मध्यरात्री अग्नितांडव; टेरेसवर अडकलेल्या १० जणांना जीवदान

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

चिंचवड गावातील कुणाल मार्केटच्या पार्किंगमध्ये मध्यरात्री दोनच्या सुमारास भीषण आग लागली. या आगीत १७ दुचाकी आणि चार चारचाकी अशी एकूण २१ वाहने जळून खाक झाली. दरम्यान, आगीमुळे इमारतीच्या टेरेसवर अडकलेल्या १० नागरिकांची अग्निशमन दलाच्या जवानांनी सुखरूप सुटका केली. या घटनेत एक जण किरकोळ जखमी झाला असून, वाहनांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, कुणाल मार्केटच्या पार्किंगमध्ये मध्यरात्री अचानक आग लागली. काही वेळातच आगीने रौद्ररूप धारण केले आणि पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या वाहनांना आग लागली. आगीच्या ज्वाळा आणि धुरामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. याचदरम्यान, इमारतीच्या टेरेसवर १० नागरिक अडकून पडले होते.

घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेतली. जवानांनी पाण्याचा मारा करून आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न सुरू केले. त्याचवेळी बचावकार्य करत टेरेसवर अडकलेल्या सर्व १० नागरिकांना सुरक्षितपणे बाहेर काढले. जवानांच्या तत्परतेमुळे संभाव्य मोठी जीवितहानी टळली.

आगीचे कारण अस्पष्ट

या आगीत २१ वाहने पूर्णपणे जळाल्याने वाहनमालकांचे मोठे नुकसान झाले आहे. आग शॉर्ट सर्किटमुळे लागली की अन्य कारणामुळे, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. पोलीस आणि अग्निशमन दलाकडून घटनेची माहिती घेऊन पुढील तपास सुरू आहे.

अनधिकृत बांधकामांना लगाम; नगरसेवकांवरही कारवाईचा इशारा

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

पिंपरी-चिंचवड शहरातील अनधिकृत बांधकामांविरोधात महापालिकेने कठोर भूमिका घेतली आहे. अनधिकृत बांधकामांवरील कारवाईला नगरसेवकांनी विरोध करू नये. विरोध केल्यास शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी संबंधित नगरसेवकांवर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा महापालिका आयुक्त विजय सूर्यवंशी यांनी दिला. तसेच अनधिकृत बांधकामांना आळा घालण्यासाठी मुद्रांक विभाग आणि महावितरणला पत्र देण्यात आले असून, नवीन नळजोडही बंद करण्यात येणार आहेत.

आयुक्त सूर्यवंशी यांनी बुधवारी पत्रकारांशी संवाद साधताना शहरातील अनधिकृत बांधकामे, प्राणीसंग्रहालयाचे रखडलेले काम आणि पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या उपाययोजनांची माहिती दिली.

शहरात अनधिकृत बांधकामे होऊ नयेत, यासाठी महापालिका प्रयत्नशील आहे. अनधिकृत बांधकामांची सर्वेक्षण क्रमांकासह माहिती मुद्रांक विभागाला देण्यात आली आहे. त्यामुळे अशा बांधकामांची नोंदणी होणार नाही, अशी अपेक्षा आहे. तसेच अनधिकृत बांधकामांना वीजजोडणी देऊ नये, यासाठी महावितरणला पत्र देण्यात आले आहे. अशा बांधकामांना महापालिकेकडून पाणीपुरवठाही केला जाणार नसल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले.

बांधकाम व्यावसायिक प्रक्रिया केलेले पाणी वापरतात की नाही, याची पथकांकडून अचानक तपासणी केली जाणार आहे. तसेच नागरिक आणि बांधकाम व्यावसायिकांना नवीन नळजोड दिला जाणार नसल्याचे आयुक्तांनी सांगितले. सदनिकाधारकांना पाणी उपलब्ध करून देण्याची जबाबदारी बांधकाम व्यावसायिकांनी परवानगी घेताना मान्य केली आहे. त्यामुळे त्यांनी ही जबाबदारी पार पाडावी, असे आवाहनही आयुक्तांनी केले.

नवीन नळजोडण्यांवर बंदी; बांधकामांवरही निर्बंध!

दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड शहरात दहा टक्के पाणीकपात लागू करण्यात आली आहे. पाणीगळती आणि पाणीचोरी रोखण्यासाठी महापालिकेकडून विशेष पथके नेमण्यात आली असून, पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी विविध उपाययोजना केल्या जात आहेत. शहरातील सुरू असलेल्या बांधकामांसह नवीन बांधकामांनाही प्रक्रिया केलेले पाणी वापरणे बंधनकारक करण्यात आले आहे. बांधकामांसाठी टँकरद्वारे आणलेले पाणी वापरण्यासही मनाई करण्यात आली आहे. याशिवाय, नागरिक आणि बांधकाम व्यावसायिकांना नवीन नळजोडण्या दिल्या जाणार नाहीत. बांधकाम व्यावसायिकांकडून नियमांचे पालन केले जात आहे की नाही, याची तपासणी करण्यासाठी महापालिकेची पथके अचानक बांधकामांच्या ठिकाणी भेट देणार आहेत. तसेच, बांधकामांना परवानगी घेताना सदनिकाधारकांना पाणी उपलब्ध करून देण्याची जबाबदारी स्वीकारल्याचे बांधकाम व्यावसायिकांनी लेखी दिले आहे. त्यामुळे संबंधित व्यावसायिकांनी ही जबाबदारी पूर्ण करावी, असे स्पष्ट निर्देश आयुक्त विजय सूर्यवंशी यांनी दिले आहेत. शहरातील उपलब्ध पाणीसाठ्याचे योग्य नियोजन करून नागरिकांना पाणीटंचाईचा त्रास कमी व्हावा, यासाठी प्रशासनाकडून प्रयत्न केले जात आहेत.

पाणी नियमभंगावर कारवाई!

पिंपरी-चिंचवड शहरात पाण्याचा वापर नियंत्रित करण्यासाठी महापालिका प्रशासनाने कठोर उपाययोजना करण्यास सुरुवात केली आहे. शहरात दहा टक्के पाणीकपात लागू असताना बांधकामांसाठी पिण्याच्या पाण्याचा वापर टाळण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. बांधकाम व्यावसायिकांनी प्रक्रिया केलेल्या पाण्याचा वापर करणे बंधनकारक असून, टँकरद्वारे पिण्याचे पाणी आणून बांधकामासाठी वापरण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच, नागरिक आणि बांधकाम व्यावसायिकांना नवीन नळजोडण्या देण्यावरही निर्बंध घालण्यात आले आहेत. या नियमांची अंमलबजावणी योग्य प्रकारे होत आहे की नाही, याची खातरजमा करण्यासाठी महापालिकेची पथके अचानक तपासणी करणार आहेत. पाणीवापरासंदर्भातील नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर प्रशासनाकडून कारवाई केली जाणार आहे. पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करणे आणि पिण्याच्या पाण्याची नासाडी रोखणे, हे महापालिकेसमोरील महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.

भूमिका

आंदोलनांचा अधिकार, नागरिकांच्या जगण्याचे काय?

लोकशाहीमध्ये आंदोलन करण्याचा अधिकार महत्त्वाचा आहे; मात्र या अधिकाराचा वापर करताना सामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर गदा येता कामा नये. दिल्ली, मुंबईसह अन्य महानगरांमध्ये नुकत्याच निर्माण झालेल्या आंदोलनांच्या परिस्थितीने हा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आणला आहे.

दिल्लीत बॅरिकेड्स, मेट्रो स्थानके बंद, इंटरनेट सेवा स्थगित, आंदोलकांना ताब्यात घेणे आणि सुमारे २५ हजार पोलिसांचा बंदोबस्त, अशा उपाययोजना कराव्या लागल्या. या परिस्थितीमुळे सुमारे दोन हजार कोटी रुपयांचा व्यापार बुडाल्याचा दावा व्यापाऱ्यांनी केला आहे. या घटनांकडे केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणून पाहून चालणार नाही; त्यामागे नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचा प्रश्नही दडलेला आहे. भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि शांततेने एकत्र जमण्याचा अधिकार दिला आहे. सरकारच्या धोरणांवर टीका करणे, अन्यायाविरोधात आवाज उठवणे आणि आपल्या मागण्यांसाठी संघटित होणे हे लोकशाहीचे अविभाज्य घटक आहेत.

मात्र, कोणताही अधिकार अमर्याद नसतो. संविधानाने मुक्त संचार, व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य आणि जीवनाचा अधिकारही नागरिकांना दिला आहे. त्यामुळे आंदोलनाच्या नावाखाली रस्ते अडवणे, वाहतूक ठप्प करणे, दुकाने बंद पडणे किंवा रुग्णांना रुग्णालयांपर्यंत पोहोचण्यास अडथळे निर्माण होणे, याचे समर्थन करता येणार नाही. सर्वोच्च न्यायालयाने विविध निकालांमधून या विषयावर महत्त्वपूर्ण भूमिका स्पष्ट केली आहे. हिमतलाल के. शाह प्रकरणात सार्वजनिक ठिकाणी सभा घेण्याचे नियमन करण्याचा सरकारचा अधिकार मान्य करतानाच शांततापूर्ण सभांवर मनमानी बंदी घालता येणार नसल्याचे स्पष्ट केले. मजदूर किसान शक्ती संघटन प्रकरणात आंदोलक आणि स्थानिक नागरिक यांच्या अधिकारांमध्ये समतोल राखण्याची गरज अधोरेखित करण्यात आली. तर अमित साहनी विरुद्ध दिल्ली पोलीस प्रकरणात सार्वजनिक रस्ते अनिश्चित काळासाठी अडवून ठेवण्याच्या प्रकारावर न्यायालयाने स्पष्ट भूमिका घेतली. या निकालांचा अर्थ आंदोलनांवर बंदी घालणे असा नाही. उलट, आंदोलनासाठी योग्य जागा उपलब्ध करून देणे, परवानगीची प्रक्रिया पारदर्शक ठेवणे आणि अत्यावश्यक सेवांचा मार्ग मोकळा ठेवणे, ही प्रशासनाची जबाबदारी आहे.

त्याचवेळी आंदोलकांनीही आपल्या मागण्या मांडताना इतर नागरिकांच्या हक्कांचा विचार करणे आवश्यक आहे. व्यापारी, कामगार, विद्यार्थी, रुग्ण आणि रोजंदारीवर जगणाऱ्या नागरिकांना आंदोलनामुळे आर्थिक किंवा वैयक्तिक नुकसान सहन करावे लागणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे. प्रशासनानेही सार्वजनिक सुव्यवस्थेच्या नावाखाली सरसकट निर्बंध लादू नयेत. आंदोलनाचा विषय संवेदनशील असो किंवा राजकीयदृष्ट्या महत्त्वाचा, निर्णय घेताना परिस्थितीची गंभीरता, नागरिकांची गैरसोय आणि निर्बंधांची आवश्यकता यांचा विचार झाला पाहिजे. संवाद, पर्यायी वाहतूक व्यवस्था आणि नियोजन यांच्या माध्यमातून संघर्ष टाळता येऊ शकतो.

आंदोलनाचा अधिकार म्हणजे स्वतःचा आवाज ऐकवण्याचा अधिकार; इतरांचा आवाज आणि जगण्याचा मार्ग बंद करण्याचा नव्हे. त्याचप्रमाणे, कायदा-सुव्यवस्था राखणे म्हणजे विरोधाचा आवाज दडपणेही नव्हे. आंदोलन आणि सामान्य नागरिकांचे जीवन यांच्यात संघर्ष निर्माण होणार नाही, अशी व्यवस्था उभी करणे हेच लोकशाहीसमोरील खरे आव्हान आहे. संविधानाने दिलेल्या स्वातंत्र्यांचा सन्मान राखताना नागरिकांच्या जगण्याच्या अधिकाराचे संरक्षण झाले, तरच लोकशाहीचा समतोल टिकून राहील.

प्रासंगिक »

खरा कलाकार

शंकरकाका अनेक वर्षांपासून नाटकांचे नेपथ्य तयार करत असत. एकदा नाटक सुरू असताना अचानक राजवाड्याची सजावट कोसळली. कलाकार घाबरले आणि प्रयोग थांबण्याची वेळ आली.

शंकरकाकांनी तातडीने लाकडी चौकटी आणि कापडाच्या मदतीने नवीन नेपथ्य तयार केले. काही वेळात नाटक पुन्हा सुरू झाले. प्रेक्षकांनी कलाकारांचे भरभरून कौतुक केले.

दुसऱ्या दिवशी आयोजकांनी शंकरकाकांचा विशेष सन्मान केला. एका कलाकाराने त्यांना विचारले, “काका, तुम्ही नेहमी पडद्यामागे राहूनही इतक्या मनापासून काम कसे करता?”

शंकरकाका हसून म्हणाले, “प्रत्येकाने प्रसिद्ध व्हावे असे नाही. आपल्यामुळे दुसऱ्याचे काम यशस्वी झाले, तरी मनाला समाधान मिळते.” त्यांचे उत्तर ऐकून सर्व कलाकारांनी त्यांचे आभार मानले. यापुढे त्यांनी पडद्यामागील कर्मचाऱ्यांचाही सन्मान करण्याचे ठरवले.

- तात्पर्य : प्रत्येकाच्या योगदानाला महत्त्व असते. प्रसिद्धीपेक्षा प्रामाणिकपणे केलेले काम मोठे असते.

महाराष्ट्रासह उत्तर प्रदेश, बिहार आणि कर्नाटकातील शिक्षक व पदवीधर मतदारसंघांच्या विधान परिषद निवडणुकांनी राजकीय पक्षांना आत्मपरीक्षण करण्याची संधी दिली आहे.

पाच सिकंदर, दोन बाजीगर; प्रस्थापितांना नवा इशारा!

महाराष्ट्रातील पाच जागांच्या लढतीत महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यात चुरस दिसली. शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने पुणे आणि औरंगाबाद पदवीधर मतदारसंघात मिळवलेले यश महाविकास आघाडीसाठी दिलासादायक ठरले. दुसरीकडे, भाजप आणि शिंदेसेनेनेही विजय मिळवून आपले राजकीय अस्तित्व दाखवून दिले. मात्र, या निकालांचे महत्त्व केवळ पक्षीय विजय-पराजयापुरते मर्यादित नाही.

या निवडणुकांमध्ये नितेश कराळे आणि रविराज साबळे या दोन तरुणांनी मिळवलेली मते विशेष लक्षवेधी ठरली. प्रस्थापित राजकारणावर टीका करणाऱ्या आणि शिक्षणव्यवस्थेतील प्रश्नांवर आवाज उठवणाऱ्या या उमेदवारांनी मतदारांचे लक्ष वेधले. त्यांच्या मतांची संख्या हा तरुणांमधील असंतोषाचा किंवा पर्यायी नेतृत्वाच्या शोधाचा संकेत असू शकतो. मात्र, त्यावरून संपूर्ण तरुण पिढीचा कल निश्चित झाला, असे म्हणणे घाईचे ठरेल. तरीही प्रस्थापित राजकीय समीकरणांना आव्हान देण्याची क्षमता नव्या चेहऱ्यांमध्ये असल्याचे या लढतींनी दाखवून दिले.

शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघांची निर्मिती ही सुशिक्षित वर्गाला विधिमंडळात प्रतिनिधित्व मिळावे, या उद्देशाने झाली. शिक्षकांचे प्रश्न, शिक्षणाचा दर्जा, रोजगार आणि शैक्षणिक धोरणांवर चर्चा घडवून आणणे ही या प्रतिनिधींची महत्त्वाची जबाबदारी आहे. मात्र, या निवडणुकांमध्ये पैसा, राजकीय प्रतिष्ठा आणि पक्षीय शक्तिप्रदर्शन यांचे वाढते महत्त्व चिंताजनक आहे. मतदारांना प्रलोभने दाखवून किंवा आर्थिक प्रभावाचा वापर करून विजय मिळवण्याचे प्रकार वाढत असतील, तर या मतदारसंघांच्या मूळ उद्देशालाच धक्का बसतो. राजकीय पक्षांनी या निवडणुकांना प्रतिष्ठेचा प्रश्न बनवण्याऐवजी शिक्षक आणि पदवीधरांच्या प्रश्नांना प्राधान्य दिले पाहिजे. उमेदवारांची शैक्षणिक क्षेत्रातील बांधिलकी, कामाचा अनुभव आणि प्रश्न सोडवण्याची क्षमता यांचा विचार मतदारांनीही करणे आवश्यक आहे.

अखेर, पाच जागांवरील विजय किंवा पराभव यापेक्षा या निवडणुकांनी दिलेला संदेश महत्त्वाचा आहे. नव्या चेहऱ्यांना मिळणारा प्रतिसाद, प्रस्थापित व्यवस्थेबद्दलचे प्रश्न आणि शिक्षण क्षेत्रातील राजकीय हस्तक्षेप यांचा गांभीर्याने विचार व्हायला हवा. लोकशाहीत मतांची बेरीज महत्त्वाची असतेच; पण त्या मतांमागील अपेक्षा समजून घेणे त्याहून महत्त्वाचे आहे. शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघांनी आपली स्वतंत्र ओळख टिकवली, तरच त्यांचे प्रतिनिधित्व खऱ्या अर्थाने अर्थपूर्ण ठरेल.

।। अभंगवाणी ।।

देखोनि पुराणिकांची दाढी ।
रडे स्फुंदे नाक ओढी ॥१॥

प्रेम खरें दिसे जना ।
भिन्न अंतरीं भावना ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक. (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

तीन जागांच्या पराभवावरून महायुतीत जुंपली!

भाजपचा शिवसेनेवर मित्रधर्म न पाळल्याचा आरोप, तर शिवसेनेचा पलटवार

महाईन्यूज । मुंबई

विधान परिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघांच्या निवडणुकीत महायुतीला पाचपैकी केवळ दोनच जागांवर समाधान मानावे लागल्याने, भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) यांच्यातील अंतर्गत संघर्ष कमालीचा विकोपाला गेला आहे. मित्रपक्षानेच ऐनवेळी 'दगाफटका' केल्याचा थेट आरोप करत भाजपने आपल्या पराभवाचे खापर शिंदेंच्या शिवसेनेवर फोडले आहे. तर दुसरीकडे, भाजपची 'चुकीची उमेदवार निवड' आणि त्यांच्याच पक्षातील 'असंतोष व अंतर्गत बंडखोरी' यांमुळे हा घात झाल्याचा पलटवार शिवसेनेने केला आहे. या निकालानंतर महायुतीमधील वरकरणी दिसणारी एकजूट मोडीत निघाली असून अंतर्गत सुंदोपसुंदी चव्हाट्यावर आली आहे. विधानसभा निवडणुकीत मित्रपक्षांनी पायात पाय घातल्याने झालेल्या पराभवांवरूनही उभयता तोंडसुख घेत असल्याचे या निमित्ताने दिसून आले.

मित्रपक्षांना योग्य सन्मान द्या

भाजपच्या आरोपांना उत्तर देताना आनंद परांजपे यांनी पुणे पदवीधर मतदारसंघातील उमेदवार निवडीवरून भाजपला लक्ष्य केले. पुणे पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांपैकी एक जागा शिवसेनेला मिळावी, अशी पक्षाची पहिल्या दिवसापासून मागणी होती. मात्र, भाजपने पुणे पदवीधर, पुणे शिक्षक आणि नागपूर पदवीधर अशा तीन जागांवर उमेदवार जाहीर केले. पुणे शिक्षक मतदारसंघातील शिवसेनेचे उमेदवार मंगेश चिवटे यांनी अर्ज मागे घेतला, तरी पुण्यातील एका जागेवर निवडणूक लढवण्याची कार्यकर्त्यांची मागणी कायम होती, असे परांजपे यांनी सांगितले.

निकाल जिव्हारी

विधान परिषदेच्या पाच मतदारसंघांतील निकालात महाविकास आघाडीने तीन, तर महायुतीने दोन जागा जिंकल्या. पुणे, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर या तिन्ही पदवीधर मतदारसंघांत महाविकास आघाडीचे उमेदवार विजयी झाले. पुणे शिक्षक मतदारसंघ भाजपने, तर अमरावती शिक्षक मतदारसंघ शिवसेनेने जिंकला. म्हणजेच महायुतीला शिक्षक मतदारसंघांत यश मिळाले, परंतु पदवीधर मतदारसंघांत एकही जागा राखता आली नाही.

या पराभवानंतर गुरूवारी महायुतीमधील आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी अधिकच तीव्र झाल्या. भाजपचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी, “शिवसेनेने निवडणुकीत मित्रधर्म पाळला नाही,” असा थेट वार केला. भाजपच्या या हल्ल्याला शिवसेनेचे प्रवक्ते आनंद परांजपे यांनीही त्याच भाषेत प्रत्युत्तर दिले असून, “भाजपने आधी स्वतःच्या चुकीच्या रणनीतीचे आणि पराभवाचे आत्मपरीक्षण करावे,” असा खोचक सल्ला दिला आहे. परस्परांमधील संशयाचे वातावरण आणि भविष्यातील राजकीय वर्चस्व सिद्ध करण्यासाठीची महायुतीतील लढाई यामुळे अधिक अटीतटीची बनली आहे.

पुणे शिक्षक मतदारसंघात भाजपचे कौस्तुभ गावडे विजयी झाले. मात्र, शिवसेनेने ऐनवेळी अपक्ष सचिन सानप यांना पाठिंबा दिल्याने महायुतीतील मतभेद उघड झाले. शिवसेनेचे अधिकृत उमेदवार मंगेश चिवटे यांनी माघार घेतल्यानंतरही पक्षाने सानप यांना पाठिंबा दिला. या भूमिकेमुळे महायुतीच्या अधिकृत उमेदवाराला अपेक्षित सहकार्य मिळाले नाही, असा आरोप नवनाथ बन यांनी केला. शिवसेनेने महायुतीचा धर्म पाळून भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसला सहकार्य केले असते, तर पाचही जागांवर विजय मिळवता आला असता, असा दावा बन यांनी केला. पुण्यातील एका जागेसाठी स्वतंत्र भूमिका घेतल्यामुळे मित्रपक्षांचे नुकसान झाले आणि तीन जागांवरील विजयाची संधी गमावली, असे त्यांचे म्हणणे आहे. एका जागेसाठी मित्रपक्षांना अडचणीत आणण्याची भूमिका महायुतीच्या हिताची नसल्याचेही त्यांनी म्हटले.

भाजप नेते केशव उपाध्ये यांनीही, हा निकाल विरोधकांच्या यशापेक्षा महायुतीतील काही 'हितचिंतकांच्या' कर्तृत्वाचा पुरावा असल्याचे म्हटले आहे. २०१९ मध्ये मुख्यमंत्रीपदाच्या हव्यासापोटी उद्धव ठाकरे यांनी काँग्रेस आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला सत्तेची संजीवनी दिली आणि त्यातून महाराष्ट्राच्या राजकारणाची दिशा बदलली, असा आरोप करत त्यांनी इतिहासातील तीच चूक पुन्हा होऊ नये, यासाठी आत्मचिंतन करण्याची वेळ आल्याचे म्हटले आहे. 'एकाने प्रामाणिकपणे काम करायचे आणि दुसऱ्याने वेगळा सवतासुभा मांडायचा, असा संसार असतो का?' असा सवालही उपाध्ये यांनी शिवसेनेचे नाव न घेता उपस्थित केला.

मीनाक्षी शिंदेंचा शिवसेनेच्या (शिंदे गट) जिल्हाप्रमुखपदाचा राजीनामा!

महाईन्यूज । ठाणे

ठाण्यातील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रदीप पूर्णेकर यांच्या हत्या प्रकरणात आरोपांची सरबत्ती झालेल्या एकनाथ शिंदे यांच्या निकटवर्ती मानल्या जाणाऱ्या शिवसेना (शिंदे गट) पक्षाच्या महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख आणि ठाण्याच्या माजी महापौर, नगरसेविका मीनाक्षी शिंदे यांनी गुरुवारी दुपारी राजीनामा दिला. राज्याचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी मीनाक्षी शिंदे यांनी राजीनामा द्यावा अशी सूचना बुधवारी पत्रकार परिषदेत केली होती. विशेष म्हणजे, २४ तास उलटत नाही तोच मीनाक्षी शिंदे यांनी आपल्या पदाचा राजीनामा एकनाथ शिंदे यांच्याकडे सादर केला.

पूर्णेकर हत्या प्रकरणावरून ठाण्यातील राजकीय वातावरण तापले असताना परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी मीनाक्षी शिंदे यांच्या राजीनाम्याबाबत आपले मत व्यक्त केले होते. मी सुद्धा राज्याचा मंत्री आहे. पण, माझ्यावर गंभीर आरोप झाले तर, मी पक्षाच्या प्रमुखांना सांगेन की, आरोप सिद्ध होईपर्यंत मी पद सोडतो, अशी माझी प्रांजळ भूमिका असेन, असे सरनाईक म्हणाले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सांगितले की, मिनाक्षी शिंदे या आपल्या पक्षाच्या नेत्या आहेत. त्यांच्यावर जर आरोप होत असेल तर, त्यांनी चौकशी होईपर्यंत पक्षाचे पद बाजूला काढून ठेवले तर ते अतिशय योग्य होईल. असे माझे वैयक्तिक मत आहे, असे सरनाईक यांनी स्पष्ट होते.

अखेर प्रदीप पूर्णेकर यांच्या हत्येनंतर महिन्याभराने मीनाक्षी शिंदे यांनी महिला आघाडी पदाचा राजीनामा दिला आहे. त्यांनी एकनाथ शिंदे यांना पत्र लिहीत राजीनामा दिला आहे. त्यामध्ये समाजमाध्यमावर तसेच पक्षपातळीवर माझ्याबाबत सुरु असलेले आरोप प्रत्यारोप व सर्वपक्षीय एकत्र येऊन माझ्यावर विविध आरोप करत पक्ष नेतृत्वास अर्थात मुख्य नेते व पालकमंत्री म्हणून आपणास वेठीस धरण्याचे षड्यंत्र सुरु आहे. हे पाहून माझ्या मनाला प्रचंड वेदना झाल्या.

मी आजवर संपूर्ण निष्ठेने काम केले. पक्षाला किंवा आपणास कधीही मान खाली घालावी लागेल असे कोणतेही कृत्य केले नाही. तरीही ज्या प्रकरणांशी माझा काहीही संबंध नाही त्यामध्ये माझे नाव जोडून आपल्यावर आणि पक्षावर दबाव निर्माण केला जात आहे, हे पाहून मन व्यथित होते. ज्या नेतृत्वाचा सन्मान जपण्यासाठी मी आजवर काम केले. त्याच नेतृत्त्वाच्या बदनामीचे कारण माझ्यामुळे व्हावे ही कल्पनाही मला सहन होत नाही. माझी निष्ठा आणि माझ्या कार्याची पावती आरोपांच्या माध्यमातून दिली जात असल्याची भावना मनाला बोचत आहे. म्हणूनच, मी महिला आघाडी प्रमुख पदाचा राजीनामा देत आहे. पक्षाची प्रतिष्ठा आणल्या नेतृत्वाचा सन्मान जपण्यासाठी घेतला असल्याचे त्यांनी पत्रात म्हटले आहे.

'पोलिसांना घाबरू नका, लाठ्यांची भीती बाळगू नका'

राहुल गांधींची थेट हाक, १ नोव्हेंबरला दिल्लीत 'व्होट चोरी'विरोधात एल्गार!

महाईन्यूज | नवी दिल्ली

देशातील कथित 'व्होट चोरी'च्या मुद्द्यावरून काँग्रेस नेते तथा लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्र सरकार आणि निवडणूक आयोगाविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. येत्या १ नोव्हेंबर रोजी नवी दिल्लीतील रामलीला मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या 'चलो दिल्ली' मोर्चात देशभरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले आहे. विशेष म्हणजे, 'पोलिसांची किंवा लाठ्यांची भीती बाळगू नका. लोकशाही आणि संविधानाच्या रक्षणासाठी निर्भयपणे पुढे या,' अशा शब्दांत राहुल गांधी यांनी देशवासीयांना साद घातली आहे.

गुरुवारी (२९ ऑक्टोबर) सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर प्रसिद्ध केलेल्या व्हिडिओ संदेशातून राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावर निशाणा साधला. देशातील लोकशाही व्यवस्था आणि संविधानिक मूल्यांचे संरक्षण करण्यासाठी नागरिकांनी पक्षीय मतभेद बाजूला ठेवून एकत्र यावे, असे त्यांनी म्हटले आहे.

'चलो दिल्ली रामलीला मार्च' हा कोणत्याही एका राजकीय पक्षाचा मोर्चा नाही, तर भारताच्या आत्म्याचा मोर्चा आहे. लोकशाही वाचवणे, कथित मतचोरी रोखणे आणि संविधानाचे रक्षण करणे हा या आंदोलनाचा मुख्य उद्देश असल्याचे राहुल गांधी यांनी स्पष्ट केले. देशातील सध्याच्या राजकीय परिस्थितीबाबत नाराजी असलेल्या प्रत्येक नागरिकाने या आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

मोर्चाच्या पार्श्वभूमीवर राहुल गांधी यांनी भाजपावरही जोरदार टीका केली. पोलिसांच्या कारवाईची किंवा लाठ्यांची चिंता करण्याची गरज नाही. भाजपामध्ये अशा प्रकारची कारवाई करण्याचे धाडस नसेल, असा दावा त्यांनी केला. संविधान आणि देशाच्या रक्षणासाठी सर्वांनी एकत्र चालण्याची गरज असून, हा देशातील प्रत्येक नागरिकाचा मोर्चा असल्याचेही त्यांनी सांगितले.

विशेषतः विद्यार्थी आणि तरुणाईला राहुल गांधी यांनी या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. विद्यार्थ्यांच्या अभिव्यक्तीस्वातंत्र्यावर, विचारांवर अथवा मतांवर हल्ला होत असल्याचे वाटत असेल, तर त्यांनी लोकशाहीच्या संरक्षणासाठी पुढाकार घ्यावा. विद्यार्थी कोणत्याही राजकीय विचारसरणीचे असले तरी संविधानाच्या रक्षणासाठी एकत्र येणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

दरम्यान, मतदार याद्यांमधील कथित अनियमितता आणि मतदान प्रक्रियेतील पारदर्शकतेच्या मुद्द्यावरून विरोधकांनी केंद्र सरकार तसेच निवडणूक आयोगावर टीकेची झोड उठवली आहे. विरोधकांकडून 'व्होट चोरी'चे आरोप केले जात असले तरी हे आरोप सिद्ध झालेले नाहीत. या पार्श्वभूमीवर दिल्लीतील आंदोलनाला विशेष राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे.

राहुल गांधी यांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शाह आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना लक्ष्य केल्यामुळे राजकीय वातावरण तापण्याची शक्यता आहे. लोकशाही आणि संविधानाच्या रक्षणाचा मुद्दा पुढे करत विरोधकांकडून करण्यात येणारे हे शक्तिप्रदर्शन कितपत यशस्वी ठरणार, याकडे आता देशाचे लक्ष लागले आहे. तसेच १ नोव्हेंबरच्या मोर्चाला केंद्र सरकार आणि निवडणूक आयोगाकडून काय प्रतिसाद मिळतो, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

'हा कोणत्याही पक्षाचा नव्हे, भारताच्या आत्म्याचा मोर्चा!'

लोकशाही वाचवण्यासाठी, कथित मतचोरी रोखण्यासाठी आणि संविधानाचे रक्षण करण्यासाठी १ नोव्हेंबर रोजी दिल्लीत आयोजित मोर्चात नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन राहुल गांधी यांनी केले. 'पोलिसांची किंवा लाठ्यांची भीती बाळगू नका. हा देशाचा मोर्चा आहे आणि तुमचाही मोर्चा आहे,' असे सांगत त्यांनी विशेषतः विद्यार्थी आणि तरुणाईला आंदोलनात सहभागी होण्याची साद घातली.

पाकिस्तानातील हिंदूंची लोकसंख्या १४.६ टक्क्यांवरून १.६१ टक्क्यांवर

महाईन्यूज | नवी दिल्ली

पाकिस्तानातील हिंदू समाजाच्या लोकसंख्येतील ऐतिहासिक घट आणि धार्मिक अल्पसंख्याकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा आंतरराष्ट्रीय पातळीवर चर्चेत आला आहे. ब्रिटनमधील 'इन्ससाइट युके' या हिंदू संघटनेने २८ ऑक्टोबर रोजी ब्रिटिश हिंदूंसाठीच्या सर्वपक्षीय संसदीय गटासमोर अहवाल सादर केला. यामध्ये पाकिस्तानातील हिंदूंना धार्मिक भेदभाव, हिंसाचार, सक्तीचे धर्मांतर, मालमत्तेवरील हक्क गमावणे आणि धार्मिक स्वातंत्र्यावरील निर्बंधांचा सामना करावा लागत असल्याचा दावा करण्यात आला आहे.

अहवालानुसार, १९४१ च्या जनगणनेत पुढे पश्चिम पाकिस्तान बनलेल्या प्रदेशात हिंदूंची लोकसंख्या १४.६ टक्के होती. पाकिस्तानच्या २०२३ च्या जनगणनेनुसार 'हिंदू जाती' प्रवर्गातील लोकसंख्या १.६१ टक्के नोंदवण्यात आली आहे. मात्र, स्वतंत्रपणे नोंदवलेल्या अनुसूचित जातींचे ०.५६ टक्के प्रमाण धरल्यास एकत्रित लोकसंख्या २.१७ टक्के होते. फाळणीच्या काळातील हिंसाचार, विस्थापन आणि आर्थिक अडचणींचा हिंदू समाजावर मोठा परिणाम झाल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

फाळणीनंतर अनेक हिंदू कुटुंबांना घरे, शेती आणि मालमत्ता सोडावी लागली. 'एनिमी प्रॉपर्टी' कायद्यामुळे अनेकांच्या जमिनीवरील हक्क हिरावले गेल्याचा आरोप संघटनेने केला आहे. तसेच पाकिस्तानच्या संविधानातील कलम ४१ आणि ९१ नुसार राष्ट्रपती आणि पंतप्रधानपदासाठी मुस्लिम असणे आवश्यक असल्याने धार्मिक अल्पसंख्याकांना समान संधी मिळत नसल्याचा मुद्दाही अहवालात उपस्थित करण्यात आला आहे. इस्लामाबादमधील हिंदू मंदिराच्या उभारणीत आलेल्या अडथळ्यांचाही उल्लेख करण्यात आला आहे.

पाकिस्तानातील हिंदू आणि ख्रिश्चन समाजातील सुमारे एक हजार महिला व मुलींचे दरवर्षी अपहरण, सक्तीचे धर्मांतर आणि जबरदस्तीने विवाह लावले जात असल्याचा दावा अहवालात करण्यात आला आहे. विशेषतः गरीब आणि अल्पवयीन मुलींना अशा घटनांचा अधिक धोका असल्याचे संघटनेने म्हटले आहे. मात्र, या आकडेवारीची स्वतंत्र पडताळणी आवश्यक आहे.

या पार्श्वभूमीवर ब्रिटन सरकारने पाकिस्तानसोबतच्या चर्चेत धार्मिक अल्पसंख्याकांच्या संरक्षणाला प्राधान्य द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. पाकिस्तानला दिली जाणारी आर्थिक मदत मानवी हक्कांच्या प्रगतीशी जोडण्यासह धार्मिक छळग्रस्तांना सुरक्षित आश्रय उपलब्ध करून देण्याची शिफारसही करण्यात आली आहे.

पाकिस्तान सरकार धार्मिक अल्पसंख्याकांच्या संरक्षणासाठी उपाययोजना करत असल्याचे सांगत असले, तरी प्रत्यक्ष परिस्थितीबाबत मानवी हक्क संघटनांनी चिंता व्यक्त केली आहे. त्यामुळे या अहवालामुळे पाकिस्तानातील हिंदू आणि अन्य धार्मिक अल्पसंख्याकांच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे.

ब्रिटन सरकारसमोर पाच महत्त्वपूर्ण मागण्या!

पाकिस्तानातील धार्मिक अल्पसंख्याकांच्या संरक्षणासाठी 'इन्ससाइट युके'ने ब्रिटन सरकारकडे पाच प्रमुख उपाययोजनांची मागणी केली आहे. धार्मिक अल्पसंख्याकांच्या सुरक्षेला राजनैतिक चर्चेत प्राधान्य, मानवाधिकारांच्या प्रगतीनुसार आर्थिक मदत, ब्रिटिश उच्चायुक्तालयात अल्पसंख्याकांचे प्रतिनिधित्व, दर सहा महिन्यांनी परिस्थितीचा अहवाल आणि धार्मिक छळग्रस्तांसाठी सुरक्षित आश्रयाची व्यवस्था या मागण्यांचा त्यात समावेश आहे.

शाहरुख खानचा ‘किंग’ अवतार चर्चेत!

बॉलिवूडचा बादशाह शाहरुख खान याच्या आगामी ‘किंग’ या चित्रपटाची सध्या जोरदार चर्चा सुरू आहे. नुकताच या चित्रपटाचा नवा पोस्टर समोर आला असून, त्यातील शाहरुखच्या हटके लूकने चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. विशेष म्हणजे, केवळ चाहतेच नाही, तर बॉलिवूडमधील अनेक प्रसिद्ध कलाकारांनीही या पोस्टरवर प्रतिक्रिया देत शाहरुखवर कौतुकाचा वर्षाव केला आहे. काजोल, करीना कपूर खान, भूमी पेडणेकर आणि चित्रपट दिग्दर्शिका झोया अख्तर यांच्यासह अनेकांनी पोस्टरला पसंती दिली आहे. त्यामुळे चित्रपटाबद्दलची उत्सुकता आणखी वाढली आहे.

शाहरुख खान आपल्या आगामी ‘किंग’ या चित्रपटातून पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर दमदार भूमिका साकारण्यासाठी सज्ज झाला आहे. या चित्रपटाचा नवा पोस्टर प्रदर्शित झाल्यानंतर सोशल मीडियावर त्याची चर्चा सुरू झाली आहे. पोस्टरमध्ये शाहरुखच्या ओठांमध्ये गुलाबाचे फूल दिसत असून, त्याच्या डोळ्यांतील आक्रमक भाव आणि हटके अंदाज लक्ष वेधून घेत आहे. शाहरुखचा हा लूक त्याच्या नेहमीच्या भूमिकांपेक्षा वेगळा असल्याचे अनेक चाहत्यांचे म्हणणे आहे. त्याच्या स्टायलिश व्यक्तिमत्त्वामुळे आणि पोस्टरमधील रहस्यमय अंदाजामुळे चित्रपटात नेमकं काय पाहायला मिळणार, याबद्दल उत्सुकता निर्माण झाली आहे.

पोस्टर समोर येताच चाहत्यांनी सोशल मीडियावर विविध प्रतिक्रिया देण्यास सुरुवात केली. त्यात बॉलिवूडमधील कलाकारांचाही समावेश आहे. त्यामुळे ‘किंग’च्या पोस्टरची चर्चा मनोरंजनविश्वात रंगताना दिसत आहे.

शाहरुखच्या पोस्टरवर प्रतिक्रिया देणाऱ्या कलाकारांमध्ये अभिनेत्री करीना कपूर खान आणि काजोल यांचा समावेश आहे. करीना कपूर खान हिने हृदय आणि आगीचे इमोजी शेअर करत पोस्टरबद्दल आपले प्रेम व्यक्त केले. तिच्या या प्रतिक्रियेमुळे चाहत्यांचेही लक्ष वेधले गेले.

दुसरीकडे, अभिनेत्री काजोल आणि भूमी पेडणेकर यांनीही आगीचे इमोजी शेअर करत शाहरुखच्या नव्या लूकचे कौतुक केले. या कलाकारांच्या प्रतिक्रियांमुळे पोस्टरची सोशल मीडियावरील चर्चा आणखी वाढली आहे.

‘मुपापा’ चित्रपटात श्रेयी चौधरी नायिका

हिंदी चित्रपटसृष्टीचा दमदार अभिनेता आयुष्मान खुराना आगामी काळात ‘मुपापा’ या चित्रपटात दिसून येणार आहे. ‘मुपापा’ या चित्रपटासाठी मुख्य नायिकेचा निर्मात्यांचा शोध पूर्ण झाला आहे. ओटीटीवरील एका प्रसिद्ध अभिनेत्रीची याकरता निवड झाली आहे. आयुष्मानची मुख्य भूमिका असलेल्या ‘मुपापा’ चित्रपटात बंदिश बँडिट्स वेबसीरिज फेम अभिनेत्री श्रेया चौधरी दिसून येणार आहे. निर्मात्यांनी या चित्रपटासाठी तिच्या नावावर शिक्कामोर्तब केले आहे. श्रेयाचा अभिनेत्री म्हणून पहिल्यांदाच एखादा चित्रपट चित्रपगृहात प्रदर्शित होणार आहे. ‘मुपापा’ या चित्रपटाचे दिग्दर्शन समीर सक्सेना करत असून याची निर्मिती पोशम पा पिक्चर्स प्रॉडक्शन हाउसकडून होतेय. तसेच हा प्रोजेक्ट यशराज फिल्म्स आणि ‘पोशम पा पिक्चर्स’दरम्यान पहिली थिएट्रिकल पार्टनरशिप आहे. या चित्रपटाची कहाणी आणि कलाकारांविषयी अधिक माहिती देण्यात आलेली नाही. परंतु हा चित्रपट प्रेक्षकांना एक नवा व्हिज्युअल अनुभव मिळवून देणार अशी अपेक्षा आहे. आयुष्मानचा हा चित्रपट 19 फेब्रुवारी रोजी प्रदर्शित होणार आहे.

साराची मोठी झेप!

राम चरणच्या आगामी चित्रपटात नायिका साकारणारबालकलाकार ते मुख्य नायिका असा प्रवास केलेल्या सारा अर्जुनला धुरंधरच्या यशानंतर आणखी एक मोठा चित्रपट मिळाला आहे. सारा ही धुरंधर, धुरंधर 2 चित्रपटानंतर उदयोन्मुख कलाकारांच्या यादीत सामील झाली आहे. आता ती राम चरणच्या चित्रपटात दिसून येणार आहे. राम चरण ‘पुष्पा द राइज’चा दिग्दर्शक सुकुमारसोबत नवा चित्रपट करत आहे. याचे नाव अद्याप जाहीर करण्यात आलेले नाही. परंतु आता या चित्रपटाशी सारा अर्जुनचे नाव जोडले गेले आहे. सारा अर्जुनला या चित्रपटाची कथा पसंत पडली आहे. परंतु यासंबंधी अधिकृत घोषणा झालेली नाही. या चित्रपटाचे चित्रिकरण चालू वर्षीच सुरू होणार आहे. पेड्डीच्या प्रदर्शनानंतर राम चरणने दुखापतीमुळे ब्रेक घेतला होता आणि आता तो ‘आरसी 17’ असे तात्पुरते नाव ठेवलेल्या चित्रपटाच्या चित्रिकरणाची तयारी करत आहे. हा चित्रपट 2028 मध्ये प्रदर्शित केला जाणार आहे. सारा अर्जुन याचबरोबर संजय लीला भन्साळी यांच्याकडून निर्मित मधुबाला यांच्या बायोपिकमध्ये मुख्य भूमिका साकारणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन जसमीत के. रीन करणार आहे.

पाकिस्तानी क्रिकेटपटूकडून बुमराहची प्रशंसा

कठीण प्रसंगांत बुमराहची सातत्याने उत्कृष्ट कामगिरी; खूप काही सिद्ध करायचे आहे

महाईन्यूज । मुंबई

भारताचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह सध्याच्या काळातील सर्वोत्तम गोलंदाजांपैकी एक आहे. अत्यंत कठीण परिस्थितीतही एकहाती सामना फिरवण्याची क्षमता त्याने वारंवार सिद्ध केली आहे. पाकिस्तानचा माजी वेगवान गोलंदाज वकार युनिसने बुमराहचे कौतुक केले असले, तरी एका बाबतीत ते अजूनही पूर्णपणे समाधानी नाहीत.

शुभंकर मिश्रा यांच्या यूट्यूब चॅनेलवरील पॉडकास्टमध्ये बोलताना वकार युनिस म्हणाला, बुमराह 'व्हाइट-बॉल' (मर्यादित षटकांच्या) क्रिकेटमध्ये अपवादात्मक गोलंदाज आहे, परंतु कसोटी क्रिकेटमध्ये सर्वोत्तम गोलंदाजांच्या श्रेणीत येण्यासाठी त्याला अजूनही खूप काही सिद्ध करायचे आहे. आतापर्यंत बुमराहने ५२ कसोटी सामने खेळले असून, त्यात २३४ बळी (विकेट्स) मिळवले आहेत; त्याची सरासरी १.७ आणि स्ट्राईक रेट ४२.८ इतका आहे.

वकार म्हणाला, " कसोटी क्रिकेटचा विचार करायचा तर, त्याला अजूनही बरेच काही सिद्ध करायचे आहे; त्याने या फॉरमॅटमध्ये पुरेसे सामने खेळलेले नाहीत. कसोटी क्रिकेटमध्ये मिचेल स्टार्क आणि जोश हेझलवूडसारखे इतरही गोलंदाज आहेत. तसेच काही इंग्लिश गोलंदाजांकडेही दुर्लक्ष करून चालणार नाही.

टी-२० आणि एकदिवसीय (ODI) क्रिकेटचा प्रश्न येतो, तेव्हा मला वाटते की प्रभावाच्या बाबतीत

बुमराह कठीण प्रसंगांत सातत्याने उत्कृष्ट कामगिरी करतो. तुम्ही १०० धावा केल्या, पण तरीही तुमचा संघ सामना हरला, तर त्या शतकाचा काहीही उपयोग नाही. पण तुम्ही कठीण परिस्थितीत ४० धावा केल्या किंवा एखादी महत्त्वाची विकेट घेतली, तर त्याला खरोखर अर्थ असतो कारण त्यामुळे सामना जिंकण्यास मदत होते. माझ्या मते, बुमराह अशा प्रकारचा गोलंदाज आहे जो कठीण प्रसंगी चेंडू हातात घेतल्यावर नेहमीच अपेक्षित कामगिरी करून दाखवतो आणि हेच सर्वात महत्त्वाचे असते. त्याने हे केवळ एकदा किंवा दोनदाच नव्हे, तर अनेक प्रसंगी सिद्ध करून दाखवले आहे," असेही वकार यांनी स्पष्ट केले. २०२४-२५ च्या बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीदरम्यान, त्याने पाच कसोटी सामन्यांत एकूण ३२ बळी घेतले. इंग्लंडमध्येही त्याने प्रभावी कामगिरी केली असून, तिथे ११ कसोटी सामन्यांत ५१ बळी मिळवले आहेत. हे लक्षात घेण्यासारखे आहे की, ऑस्ट्रेलियाचे मिचेल स्टार्क आणि जोश हेझलवूड यांच्या तुलनेत, दुखापतींमुळे बुमराहला कसोटी क्रिकेटमध्ये सातत्याने खेळता आलेले नाही.

बुमराहची कसोटी आकडेवारी

वकार युनिस सध्या बुमराहला कसोटी क्रिकेटमधील सर्वोत्तम गोलंदाजांपैकी एक मानत नसले, तरी त्याची कामगिरी आणि आकडेवारी मात्र काहीतरी वेगळेच दर्शवते. बुमराहने जानेवारी २०१८ मध्ये कसोटी क्रिकेटमध्ये पदार्पण केले. त्याने आपल्या केवळ ११ व्या सामन्यात ५० कसोटी बळींचा टप्पा गाठला. अशी कामगिरी करणारा तो सर्वात जलद भारतीय वेगवान गोलंदाज ठरला आहे. त्यानंतर, २४ व्या सामन्यात त्याने आपली १०० वी कसोटी विकेट घेतली. २०१९ मध्ये, कसोटी क्रिकेटमध्ये हॅट्रिक घेणारा तो तिसरा भारतीय गोलंदाज बनला. बुमराहने 'आयसीसी मेन्स टेस्ट क्रिकेटर ऑफ द इयर २०२४' हा पुरस्कारही पटकावला आहे.

मुंबई इंडियन्समध्ये मोठा बदल; लसिथ मलिंगासह २ प्रशिक्षकांना पदावरून काढलं

महाईन्यूज । मुंबई

आयपीएल २०२७ मध्ये मुंबई इंडियन्सच्या कोचिंग स्टाफमध्ये देखील मोठे बदल होणार आहेत. मुंबई इंडियन्सने आगामी सीझनपूर्वी महेला जयवर्धनेला प्रशिक्षकपदावरून हटवलं होतं. त्यानंतर कायरन पोलार्डची मुख्य प्रशिक्षकपदी नियुक्ती केली होती. आता गोलंदाजी कोच लसिथ मलिंगासह अजून २ प्रशिक्षकांनाही मुंबई इंडियन्सने रामराम ठोकला आहे.

गेल्या काही हंगामांत मुंबईच्या संघाला अपेक्षित कामगिरी करता आलेली नाही. त्यामुळे संघाच्या व्यवस्थापनात बदल करण्यात येत आहेत. कायरन पोलार्डची नियुक्ती केल्यानंतर आता संघाच्या कोचिंग स्टाफमध्ये आणखी काही बदल झाले आहेत. दिग्गज वेगवान गोलंदाज लसिथ मलिंगा याची मुंबई इंडियन्ससोबतची वाटचाल संपली आहे. याशिवाय, गोलंदाजी प्रशिक्षक पारस म्हाम्ब्रे आणि फिल्डिंग प्रशिक्षक कार्ल हॉपकिन्सन यांनीही फ्रँचायझीची साथ सोडली आहे.

लसिथ मलिंगाने खेळाडू म्हणून मुंबई इंडियन्ससाठी महत्त्वपूर्ण योगदान दिलं होतं. निवृत्तीनंतर तो कोचिंग स्टाफचा भाग बनला आणि त्याने विविध भूमिका बजावल्या. मुंबई इंडियन्सने चार वेळा आयपीएलचं विजेतेपद पटकावलं, तसेच २०११ मध्ये चॅम्पियन्स लीग टी-२० स्पर्धा जिंकली. या यशात मलिंगाची खेळाडू म्हणून महत्त्वाची भूमिका होती. त्यानंतर त्याने मार्गदर्शक आणि प्रशिक्षक म्हणूनही मुंबई इंडियन्समध्ये पुनरागमन केलं. जागतिक क्रिकेटमधील सर्वोत्तम वेगवान गोलंदाजांमध्ये मलिंगाची गणना केली जाते. त्याच्या नावावर अनेक विक्रमही आहेत.

त्यामुळे आता १६ डिसेंबर रोजी होणाऱ्या आयपीएलच्या मिनी लिलावापूर्वी मुंबई इंडियन्स आपल्या कोचिंग स्टाफमध्ये आणखी कोणत्या नव्या सदस्यांची नियुक्ती करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागलं आहे. लसिथ मलिंगा, पारस म्हाम्ब्रे आणि कार्ल हॉपकिन्सन यांच्या बाहेर पडण्यामुळे संघाच्या कोचिंग सेटअपमध्ये मोठे बदल पाहायला मिळणार आहेत.

लसिथ मलिंगा, पारस म्हांब्रे, कार्ल हॉपकिन्सन या तिन्ही प्रशिक्षकांच्या जागी कोणाची नियुक्ती केली जाणार, याबाबत मुंबई इंडियन्सने अद्याप कोणतीही घोषणा केलेली नाही. त्यामुळे आगामी आयपीएल हंगामाच्या तयारीसाठी संघ व्यवस्थापन आपल्या सपोर्ट स्टाफची टीम कशी निश्चित करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

मलिंगासह २ कोचने सोडली मुंबईची साथ

लसिथ मलिंगा आणि पारस म्हाम्ब्रे यांच्यानंतर मुंबई इंडियन्सच्या कोचिंग स्टाफमधून कार्ल हॉपकिन्सन बाहेर पडले. २०२५ च्या हंगामापूर्वी ते मुंबई इंडियन्सच्या कोचिंग सेटअपमध्ये सहभागी झाले होते. त्यांच्याकडे संघाच्या क्षेत्ररक्षण प्रशिक्षकपदाची जबाबदारी होती. मात्र, आता मुंबई इंडियन्सने त्यांच्यापासून वेगळं होण्याचा निर्णय घेतला. या सलग बदलांमुळे मुंबई इंडियन्सच्या आगामी हंगामातील कोचिंग स्टाफच्या रचनेबाबत नव्याने चर्चा सुरू झाली आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज ™
epaper.mahaenews.com
ePaper
। शुक्रवार ।
दि. 30 ऑक्टोबर 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



शहरात नवीन नळजोडणी पूर्णपणे बंद

नागरिकांसह बांधकाम व्यावसायिकांनाही नवीन नळ कनेक्शन नाही

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

राज्यातील दुष्काळी परिस्थिती आणि भविष्यात निर्माण होणाऱ्या संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. महापालिका हद्दीत नागरिकांना तसेच बांधकाम व्यावसायिकांना नवीन नळजोडणी देणे बंद करण्यात आले आहे. महापालिका आयुक्त विजय सूर्यवंशी यांनी याबाबत माहिती दिली आहे. त्यामुळे शहरातील नवीन गृहप्रकल्प आणि नळजोडणीच्या प्रतीक्षेत असलेल्या नागरिकांपुढे अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे.

शहरातील पाणीगळती, अनधिकृत नळजोडण्या आणि पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी प्रशासनाने विशेष मोहीम हाती घेतली आहे. महापालिकेच्या पाणीपुरवठा यंत्रणेतील मोठ्या प्रमाणावरील पाणीगळती आणि अनधिकृत वापर हा चिंतेचा विषय ठरला आहे. त्यामुळे उपलब्ध पाण्याचे योग्य वितरण आणि पाणीबचत करण्यावर प्रशासनाने भर दिला आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात मोठ्या प्रमाणावर नागरीकरण होत असून, नवीन गृहप्रकल्पांची संख्या वाढत आहे. अनेक भागांमध्ये आधीपासूनच कमी दाबाने आणि अपुऱ्या प्रमाणात पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी आहेत. त्यातच नवीन नळजोडण्यांवरील निर्बंधांमुळे बांधकाम व्यावसायिकांसह सदनिकाधारकांनाही पर्यायी पाणीव्यवस्थेचा प्रश्न भेडसावू शकतो.

दरम्यान, उपलब्ध पाणीसाठ्याचा काटकसरीने वापर करावा, पाण्याची नासाडी टाळावी आणि प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेकडून करण्यात आले आहे.

नवीन नळजोडणी बंद करण्याच्या निर्णयामुळे शहरातील पाणीपुरवठ्याचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, नागरिकांना दिलासा देण्यासाठी प्रशासन कोणत्या उपाययोजना राबवते, याकडे लक्ष लागले आहे.

बांधकामांसाठी प्रक्रिया केलेले पाणी बंधनकारक

शहरातील सुरू असलेल्या तसेच नवीन बांधकाम प्रकल्पांसाठी प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा वापर बंधनकारक करण्यात आला आहे. बांधकामासाठी पिण्याच्या पाण्याचा गैरवापर होऊ नये, यासाठी महापालिकेकडून विशेष तपासणी पथके तैनात करण्यात आली आहेत. बांधकामांसाठी टँकरच्या पाण्याच्या वापरावरही निर्बंध घालण्यात आले असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे.

शहरात आधीच १० टक्के पाणीकपात

पिंपरी-चिंचवड शहरात १६ ऑक्टोबरपासून १० टक्के पाणीकपात लागू करण्यात आली आहे. कमी पर्जन्यमान आणि उपलब्ध जलसाठ्याचे दीर्घकालीन नियोजन लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे. ऑगस्ट २०२७ अखेरपर्यंत पाण्याचे नियोजन करण्याचे उद्दिष्ट महापालिकेसमोर आहे. अशा परिस्थितीत नवीन नळजोडणी बंद करण्याचा निर्णय घेण्यात आल्याने पाणीपुरवठ्यावरील निर्बंध आणखी कठोर झाले आहेत.

शालेय राज्यस्तरीय वेटलिफ्टिंग स्पर्धेत कु.तनिष्का शिंदे हिस रौप्य पदक

महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड

जिल्हा क्रीडा संकुल अमरावती येथे झालेल्या शालेय राज्यस्तरीय वेटलिफ्टिंग स्पर्धेत 58 किलोग्रॅम वजन गटात राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाचे कला वाणिज्य विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय लांडेवाडी भोसरी पुणे येथील कु. तनिष्का हरिचंद्र शिंदे इ.12 वी वाणिज्य या खेळाडूने मेहनत, शिस्त व खेळाडू वृत्तीचे दर्शन दाखवत 133 किलोग्रॅम वजन उचलून रौप्यपदक मिळविले.

तसेच या खेळाडूने यापूर्वी देखील राज्य व राष्ट्रीय स्तरावर वेटलिफ्टिंग तसेच पावरलिफ्टिंग स्पर्धेत उत्तम कामगिरी केली आहे. या खेळाडूला कनिष्ठ महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. गोपीचंद करंडे व प्रशिक्षक विजय पाटील सर यांनी विशेष मार्गदर्शन केले.

या खेळाडूंच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष व भोसरी चे प्रथम आमदार मा.श्री. विलासराव लांडे साहेब यांनी विशेष अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच संस्थेचे खजिनदार व पिंपरी चिंचवड शहर राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष श्री अजित भाऊ गव्हाणे, संस्थेचे सचिव श्री सुधीर मुंगसे सर,पिं.चिं. मनपाचे नगरसेवक व संस्थेचे विश्वस्त विक्रांतदादा लांडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कानडे के.जी , उपप्राचार्य प्रा.किरण चौधरी कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ.नेहा बोरसे, रजिस्ट्रार सौ.अश्विनी चव्हाण, विभाग प्रमुख प्रा. राजू हजारे, प्रा.योगिता बारवकर, प्रा. संगिता गवस व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष अभिनंदन केले.

झोन प्रमाणपत्रासह तीन महत्त्वाची कागदपत्रे आता ऑनलाइन

महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड

नागरिकांना जलद, पारदर्शक शासकीय सेवा उपलब्ध करून देण्यासाठी पीएमआरडीए एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. 'पीएमआरडीए'ने जीआयएस-आधारित जिओपोर्टल विकसित केले आहे. या पोर्टलद्वारे 'झोन प्रमाणपत्र', 'पार्ट प्लॅन' आणि 'साईट एलिव्हेशन प्रमाणपत्र' आता स्वयंचलित पद्धतीने ऑनलाइन उपलब्ध होणार आहेत. या सुविधेमुळे नागरिकांना पीएमआरडीए कार्यालयात वारंवार जाण्याचा आणि पाठपुरावा करण्याचा त्रासातून सुटका होणार आहे. पूर्वी प्रादेशिक योजनांच्या कागदी नकाशांची प्रत्यक्ष तपासणी करावी लागत असे आणि प्रत्येक प्रक्रियेसाठी अनेक दिवस प्रतीक्षा करावी लागत असे. मात्र, पीएमआरडीएने ही तीनही महत्त्वाची प्रमाणपत्रे ऑनलाइन उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार जीआयएस-आधारित जिओपोर्टल विकसित करण्यात आले असून, त्यामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

पूर्वी झोन प्रमाणपत्र मिळवण्यासाठी सात दिवस, पार्ट प्लानसाठी तीन दिवस, तर साईट एलिव्हेशन प्रमाणपत्रासाठी उंची आणि भौगोलिक स्थितीची तपासणी करण्यासाठी तब्बल दहा दिवस लागत असत; मात्र 'पीएमआरडीए'ने सन १९९७ मध्ये मंजूर झालेल्या पुणे प्रादेशिक योजनेचे (आरपी) डिजिटायझेशन करून ती जीआयएस प्रणालीमध्ये समाविष्ट केली आहे.

महापालिकेत बड्या अधिकाऱ्यांना नोटिसा

सात महिन्यांत ११ अधिकारी-कर्मचाऱ्यांचे निलंबन; आयुक्त विजय सूर्यवंशी यांचा कारवाईचा बडगा

महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड

पिंपरी-चिंचवड महापालिकेतील प्रशासकीय कामकाजात शिस्त आणि जबाबदारी निश्चित करण्याच्या दृष्टीने आयुक्त विजय सूर्यवंशी यांनी कारवाईचा धडाका सुरू ठेवला आहे. गेल्या सात महिन्यांत महापालिकेतील ११ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे निलंबन करण्यात आले असून, आता दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे आणि महापालिकेचे मुख्य उद्यान अधीक्षक महेश गारगोटे यांच्याकडून दोन दिवसांत लेखी खुलासा मागविण्यात आला आहे.

दोन्ही अधिकाऱ्यांशी संबंधित प्रकरणांचे स्वरूप वेगवेगळे असले, तरी प्रशासकीय जबाबदारी आणि कर्तव्यपालनाच्या मुद्द्यांवरून महापालिका प्रशासनाने ही भूमिका घेतली आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी मुदतीत खुलासा सादर न केल्यास किंवा त्यांचा खुलासा असमाधानकारक आढळल्यास नियमानुसार शिस्तभंगाची कारवाई केली जाऊ शकते, असा इशारा आयुक्तांनी दिला आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाचे (वायसीएम) अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे यांना सहायक प्राध्यापकाचा अपमान केल्याच्या प्रकरणात कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. या प्रकरणी त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल झाला असून, पोलिसांकडून चौकशी आणि तपास सुरू आहे.

या प्रकरणातील आरोपांचे स्वरूप आणि गांभीर्य लक्षात घेऊन महापालिका प्रशासनाने डॉ. वाबळे यांच्या वर्तनाबाबत स्पष्टीकरण मागवले आहे. शासकीय कर्मचाऱ्याला अशोभनीय ठरेल असे गैरवर्तन केल्याचा तसेच कर्तव्यपालनात आवश्यक असलेली सचोटी न राखल्याचा ठपका नोटिशीत ठेवण्यात आल्याचे वृत्त आहे. शासकीय सेवेत कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांकडून जबाबदार वर्तन, व्यावसायिक शिस्त आणि कर्तव्याप्रती निष्ठा अपेक्षित असते. या पार्श्वभूमीवर संबंधित प्रकरणाची गंभीरता लक्षात घेऊन प्रशासनाने खुलासा मागविण्याची कार्यवाही केली आहे.

डॉ. वाबळे यांना नोटीस मिळाल्यापासून दोन दिवसांच्या आत लेखी खुलासा सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यांचा खुलासा प्राप्त झाल्यानंतर त्यातील मुद्द्यांची तपासणी करून पुढील निर्णय घेतला जाऊ शकतो. मात्र, मुदतीत खुलासा न मिळाल्यास किंवा तो समाधानकारक नसल्यास नियमानुसार कारवाई करण्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे.

नोटीस मिळाल्यापासून दोन दिवसांच्या आत समक्ष लेखी खुलासा सादर करण्यास सांगण्यात आले आहे. निर्धारित मुदतीत खुलासा न मिळाल्यास किंवा तो असमाधानकारक आढळल्यास योग्य ती कारवाई केली जाईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

उद्यान अधीक्षकांना नोटीस

महापालिकेचे मुख्य उद्यान अधीक्षक महेश गारगोटे यांनाही वृक्षतोडीशी संबंधित प्रकरणात कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. पिंपरीतील एका खासगी जागेवरील पुरातन दर्जाच्या ५२ झाडांची संख्या आणि वय कमी दाखवून त्यामध्ये फेरफार केल्याचा, तसेच आवश्यक नियम आणि परवानग्यांचे पालन न करता वृक्षतोडीस प्रोत्साहन दिल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. या प्रकरणात महापालिकेच्या महसुलाचे नुकसान झाल्याचाही ठपका ठेवण्यात आला आहे. त्यामुळे संबंधित प्रकरणात त्यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई का करण्यात येऊ नये, याबाबत लेखी खुलासा सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

प्रशासकीय शिस्तीवर आयुक्तांचा भर

पिंपरी-चिंचवड महापालिकेत गेल्या सात महिन्यांत ११ अधिकारी-कर्मचाऱ्यांचे निलंबन करण्यात आले आहे. त्यानंतर आता दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटिसा बजावण्यात आल्याने प्रशासकीय कामकाजातील जबाबदारी निश्चित करण्यावर आयुक्त विजय सूर्यवंशी यांचा भर असल्याचे दिसून येते. कारणे दाखवा नोटीस बजावणे म्हणजे संबंधित अधिकाऱ्यांवरील आरोप अंतिमतः सिद्ध झाले आहेत, असा अर्थ होत नाही. संबंधित अधिकाऱ्यांचा खुलासा आणि उपलब्ध नोंदींच्या आधारे पुढील निर्णय घेतला जाईल. मात्र, महापालिकेच्या कामकाजात नियमांचे पालन, कर्तव्यनिष्ठा आणि जबाबदारी यांना महत्त्व देत प्रशासनाने कठोर भूमिका घेतल्याचे या कारवाईतून स्पष्ट होते.

कचऱ्याच्या प्रश्नावर आमदार शंकर जगताप आक्रमक; अधिकाऱ्यांची घेतली शाळा

महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड

मोशी येथील कचरा प्रकल्पातील दुर्घटनेनंतर पिंपरी-चिंचवड शहरातील अनेक भागांत कचरा वेळेवर उचलला जात नसल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. ठिकठिकाणी साचणारा कचरा, दुर्गंधी आणि प्रदूषणामुळे नागरिक त्रस्त असल्याच्या तक्रारी प्राप्त होताच आमदार शंकर जगताप यांनी महापालिकेत अचानक भेट देत स्वच्छतेच्या प्रश्नावर अधिकाऱ्यांना धारेवर धरले. शहरातील कचरा व्यवस्थापनाचा आढावा घेत त्यांनी अधिकाऱ्यांना जाब विचारला. 'स्वच्छ आणि सुंदर शहर हीच पिंपरी-चिंचवडची ओळख कायम राहिली पाहिजे. नागरिकांना कचऱ्याची समस्या जाणवता कामा नये,' अशा शब्दांत त्यांनी प्रशासनाला सुनावले.

मोशी येथील कचरा प्रकल्पातील दुर्घटनेनंतर कचरा संकलन आणि वाहतुकीच्या व्यवस्थेवर परिणाम झाल्याचे चित्र शहरातील काही भागांत दिसत आहे. अनेक ठिकाणी कचरा वेळेत उचलला जात नसल्याने रस्त्यांच्या कडेला आणि कचराकुंड्यांजवळ कचऱ्याचे ढीग साचत आहेत. त्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरत असून, नागरिकांना प्रदूषणाचा त्रास सहन करावा लागत आहे.

या पार्श्वभूमीवर नागरिकांकडून महापालिकेच्या स्वच्छता व्यवस्थेबाबत नाराजी व्यक्त केली जात आहे. आमदार जगताप यांनी महापालिकेत अचानक भेट देऊन संबंधित अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली. शहरातील विविध भागांतील स्वच्छतेच्या सद्यस्थितीची माहिती घेत त्यांनी कचरा संकलनातील त्रुटी आणि नागरिकांच्या तक्रारींकडे लक्ष वेधले. काही वर्षांपूर्वी स्वच्छतेच्या बाबतीत पिंपरी-चिंचवड शहराने चांगली कामगिरी केली होती. मात्र, सध्याच्या परिस्थितीत अनेक भागांत स्वच्छतेबाबत कमतरता जाणवत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

सबबी नकोत, काम करा

कचरा व्यवस्थापनातील अडचणींचे कारण पुढे करून जबाबदारी झटकण्याऐवजी अधिकाऱ्यांनी समस्येवर तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी भूमिका आमदार जगताप यांनी मांडली. महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी कार्यालयात बसून आढावा घेण्यापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून परिस्थितीची पाहणी करावी आणि स्वच्छतेच्या कामावर लक्ष ठेवावे, असे त्यांनी स्पष्ट केले. शहरातील प्रत्येक भागात नियमित कचरा संकलन, वेळेत वाहतूक आणि स्वच्छता राखण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे. कोणत्याही नागरिकाला कचऱ्यामुळे त्रास होता कामा नये, यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे. कामात कुचराई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही जगताप यांनी दिला.

Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046